## ▪ नाविन्य पूर्ण कार्यक्रम :

### 1. स्वच्छता मतदान

दि. २१ जुन रोजी ग्रामीण भागाताल नागरिकामध्ये स्वच्छतेची जाणीव करुन देण्यासाठी व उघड्यावर शौचास करणाऱ्या प्रवृत्ती संपवून पालघर जिल्हा हागणदारी मुक्त करण्याकरीता जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत विविध उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती केली. त्याचप्रमाणे सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षी शाळा सुरू होताच स्वच्छता मतदान घेण्यात आले. सन २०१६-२०१७ वर्षात स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत ७०५५४ इतकी शौचालय बांधून  झाली आहेत . या लाभार्थ्याची मुले जिल्हा परिषद शाळामध्ये शिक्षण घेतात. या मुलांना स्वच्छतेची जाणीव करून देण्यासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता विभागामार्फत स्वच्छता मतदान घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना पाच लिखित स्वरुपात प्रश्न विचारून विद्यार्थ्याकडून अभिप्राय मागविण्यात आला. यामुळे शालेय विद्यार्थ्यांनां मतदान प्रक्रियेची माहिती मिळाली.






### 2. घंटानाद मोहिम

पालघर तालुक्यातील ग्रामपंचायत माहिम येथे घंटानाद मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत वडराई गावातील शौचालय नसणाऱ्या कुटुंबांना भेटी देऊन घंटानाद करण्यात आला.







## ३. Wish -1 आणि Wish - 2

दिनांक १८/०७/२०१६ रोजी मनोर येथे जिल्हा परिषद पालघर आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विदयमाने स्वच्छता आणि सुरक्षितता कार्यशाळा (WISH-1) आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक,सर्व खातेप्रमुख, N.G.O, C.S.R व जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील तज्ञ/सल्लागार, तालुकास्तरावरील BRC/CRC यांचा प्रामुख्याने सहभाग होता. त्यानंतर दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी जिल्हा नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे युनिसेफ, जिल्हा परिषद पालघर यांच्या संयुक्त विदयमाने स्वच्छता आणि सुरक्षितता कार्यशाळा (WISH-2) पार पडली. N.G.O, C.S.R यांच्या सहयोगाने

शौचालय बांधकामास गती देण्याबाबत चर्चा करण्यात आली. CSR फडांचा वापर करुन विहित वेळेत जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी नियोजन करण्यात आले.






## 4. स्वच्छता सुरभी स्पर्धा :

दि. ०७ पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात शौचालयाचे महत्व पटवून देण्यासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग विविध उपक्रम राबविते. शालेय विद्यार्थी स्वच्छतेचा संदेश पालक व आपल्या गावातील नागरिकांपर्यंत पोहचविण्याची महत्वाची भुमिका करतात. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील ५ वी ते ८ वीचे विद्यार्थी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांना पत्र लिहून माझे शौचालय याबाबत माहिती कळविणार आहेत.

पालघर जिल्हा हागणदारी मुक्त करण्याकरीता ग्रामीण भागातील नागरिकामध्ये स्वच्छतेची जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. कुटूंबस्तर संवाद अंतर्गत ग्रामीण भागातील १ लक्ष कुटूंबांना भेटी देऊन जनतेला स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन त्यांना शौचालय बांधण्यास प्रवृत्त केले. पालघर जिल्हा परिषद शाळेतील ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यी १० ऑगस्ट रोजी मुख्य

कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांना माझे शौचालय या विषयावर पत्र लिहून शौचालय वापराचे फायदे व उघड्यावर शौचासला जाण्याचे दुष्परिणाम याची  माहिती देणार आहेत. या उपक्रमामुळे शालेतील विद्यार्थ्याना शौचालयाचे महत्व व पत्रलेखनाची माहिती  मिळेल. अशी आशा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी  श्रीम. निधी चौधरी व पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांनी व्यक्त केली.



## 5. कुटुंब स्तर संवाद अभियान :

पालघर जिल्ह्यात स्वच्छतेची व्याप्ती वाढावी व घर तिथे शौचालयाची उभारणी करण्यासाठी वैयक्तिक शौचालये नसणा-या कुटुंबांना गृह भेटी देण्यासाठी दि. २२ऑगस्ट 2016 ते ०२ ऑक्टोबर 2016 या कालावधीत कुटुंबस्तर संवाद अभियानांतर्गत “एक लक्ष भेटी स्वच्छ पालघर साठी” अभियान राबविण्यात आले. “भेटीगाठी स्वच्छतेसाठी” हे घोषवाक्य नजरेसमोर ठेवून शौचालय नसलेल्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्रवृत्त करण्याचा मानस होता. कुटुंबस्तर संवाद अभियानाचा शुभारंभ मा. प्रधान सचिव श्री. राजेशकुमार, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या उपस्थितीत डहाणू तालुक्यातील आशागड येथे संपन्न झाला